**वाचा** :- १) म.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,नाशिक यांचेकडील ज्ञापन आरोग्य/अस्था-५/११६/२०१७ दि.१/२/२०१७

२) म.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,नाशिक यांचेकडील निलंबन आदेश आरोग्य/अस्था-५/९६१/२०१७ दि.१/२/२०१७

३) म.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,नाशिक यांनी चौकशी अधिकारी नेमणुक आदेश पत्र क्र.जिपना/आरोग्य/आस्था-५/१२०२/२०१७ ना.दि.०५/०९/२०१७.

४) म.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, नाशिक यांचे कडील पुर्नस्थापित नेमणूक आदेश क्रं.आरोग्य/अस्था-५/१७८७/२०१७ दि.२९/१२/२०१७

५) जिल्हा आरोग्य अधिकारी,जि.प.नाशिक यांचा चौ.अहवाल क्र.आरोग्य/जिआअधि/वैयक्तीक/१७ दि.१६/११/१७

६) या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस क्रमांक आरोग्य/अस्था५/१७८८/२०१७ दिनांक २९/१२/२०१७

७) श्रीम.रेखा नथु जाधव,आरोग्य सेविका (महिला) यांचा दिनांक-१५ /०१/२०१८ चा खुलासा

८) या कार्यालयाची मंजुर टिपणी दिनांक :-१५ / १ /२०१८

---

नाशिक जिल्हा परिषद, नाशिक

**आदेश**

जा.क्र.आरोग्य/अस्था५/३८ /२०१८

नाशिक दिनांक: १५ / १ /२०१८

श्रीमती. रेखा नथु जाधव, आरोग्य सेविका (महिला) प्राथमिक आरोग्य केंद्र.सोनज, उपकेंद्र.सावकारवाडी, ता.मालेगांव येथे कार्यरत असतांना त्याकामी अनधिकृतपणे गैरहजर राहतात. शासन नियमाप्रमाणे मुख्यालयी राहत नाही. कामकाजात हलगर्जीपणा करणे, ग्रामस्थांना लसीकरण, कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया केसेस उदिष्ट, सर्व्हेक्षण रक्त नमुने, पाणी नमुणे तपासणी, गरोदर माता प्रसुती इ. उदिष्ट पुर्ण न करता आरोग्य सेवेपासुन वंचीत ठेवने याबाबत कर्तव्यात कसुर केल्याचे निर्दशनास आल्याने आदेश क्र.आरोग्य/आस्था-५/९१५/२०१६,दि.२३/०८/२०१६ नुसार निलंबित केले तसेच आदेश क्र. आरोग्य/ आस्था-५/९६१/१६,दि.०२/०९/२०१६ नुसार निलंबन कालावधीतील मुख्यालय प्राथमिक आरोग्य केंद्र.अंबासन,उपकेंद्र बिजोरसे ता.बागलाण येथे देण्यात आले. तसेच ज्ञापन क्रमाक आरोग्य/आस्था-५/१७८/२०१७ दिनांक ०१/०२/२०१७ अन्वये ज्ञापन व दोषारोप बजावण्यात आले.

खाते चौकशी कामीचे ज्ञापन व परिशिष्ट १ ते ४ यास श्रीम.रेखा नथु जाधव,आरोग्य सेविका (म) यांनी दिलेला खुलासा समर्पक नसल्याने त्यांचे विरुध्दचे दोषारोपांची सविस्तर खाते चौकशी करणेकरीता महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चा नियम ६ (२) नुसार आदेश क्र.आरोग्य/आस्था-५/१२०२/२०१७ दिनांक.०५/०९/२०१७अन्वये जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,नाशिक यांची चौकशी अधिकारी म्हणुन नेमणुक करणेत आलेली होती.

चौकशी अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,जि.प.नाशिक यांचे कडिल पत्र.आरोग्य/जिआअधि/वैयक्तीक/१७ दि.१६/११/२०१७ अन्वये चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे.चौकशी अहवालात नमुद केलेप्रमाणे १) कामी अनधिकृतपणे गैरहजर राहणे, २) मुख्यालयी न राहणे, ३) शासकीय कागदपत्रांमध्ये चूकीच्या नोंद घेवुन वरिष्ठांची दिशाभुल करणे व ४) ग्रामिण भागातील जनतेस आरोग्य सेवेपासुन वंचीत ठेवणे या पैकी आरोप क्र.०२ व ०४ अंशतःसिध्द झाले आहेत व आरोप क्र.३ पूर्णतः सिध्द झाला आहे.

इकडील आदेश क्र.आरोग्य/आस्था-५/१७८७/२०१७ , दिनांक २९/१२/२००७ अन्वये श्रीमती. जाधव यांचे निलंबन रद्द करुन त्यांना प्रा.आ.केंद्र. कळवाडी (ओपीडी), ता.मालेगाव येथे पदस्थापना दिलेली आहे. निलंबन कालावधीचा निर्णय स्वतंत्र घेण्यात येईल. तसेच चार पैकी एक आरोप पूर्णतः सिध्द व दोन आरोप अंशतः सिध्द होत असल्याने अंतिम कारणे दाखवा नोटिस क्रमांक आरोग्य/अस्था५/ १७८८/२०१७ दिनांक.२९/१२/२०१७ अन्वये श्रीमती जाधव यांचा महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ भाग तीन- चे नियम ४ (२) नुसार दोन वेतनवाढ पुढच्या वेतनवाढीवर कायमस्वरुपी परिणाम होईल अशा रितीने बंद का करण्यात येऊ नये या बाबतचा खुलासा मागविणेत आला आहे. त्यास श्रीमती. रेख नथु जाधव, आरोग्य सेविका (महिला) यांनी दिनांक / /२०१८ रोजी खुलासा सादर केला आहे. प्राप्त खुलाशामध्ये त्यांनी त्यांचे विरुध्दचे दोषारोप अमान्य केले आहे.

श्रीमती.जाधव, आरोग्य सेविका (महिला) यांचा खुलासा समाधानकारक नसलेने व सर्व परिस्थिती विचारात घेता सदर प्रकरणी नियुक्ती प्राधिकारी या नात्याने मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे भाग- तीन कलम ४ (दोन) नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन श्रीम. रेखा नथु जाधव, आरोग्य सेविका (म) यांना या आदेशानुसार --दोन वेतनवाढ दोन वर्षा करीता तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्याची-- शिक्षा देत आहे.

प्रस्तुत आदेशाची नोंद श्रीमती.रेखा नथु जाधव, आरोग्य सेविका (महिला) यांचे मुळ सेवापुस्तकांत घेण्यात यावी.

(दीपक कुमार मीना)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

**प्रति,**

**श्रीम. रेखा नथु जाधव, आरोग्य सेविका,(महिला) प्रा.आ.केंद्र.कळवाडी, (ओपीडी) ता.मालेगांव.**
**व्दारा : तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, मालेगांव.**

**प्रतः- तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, मालेगांव.**

**२/-** समवेत आदेशाच्या ३ प्रती जोडलेल्या असुन त्यापैकी १ प्रत श्रीम.रेखा नथु जाधव, आरोग्य सेविका (महिला) यांना बजावून दुसऱ्या प्रतीवर दिनांकित स्वाक्षरी घेऊन सदरची प्रत इकडेस सादर करावी.

प्रत :- माहिती व प्रसिध्द कक्ष साप्रवि जिल्हा परिषद नाशिक यांना जिल्हा परिषद संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

(दीपक कुमार मीना)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**